**BDC LIBRARY**

**News Paper Clipping**

**A.Y. 2025-26**



प्रभात

www.dainikprabhat.com


# पाटणला शनिवारपासून महोत्सवाचे आयोजन

कराड, दि. २२ (प्रतिनिधी) - कोयना एज्युकेशन सोसायटी, बाळासाहेब देसाई महाविद्यालय आणि रोटरी क्लब यांच्यावतीने पाटण येथे दि. २८ फेब्रुवारी ते २ मार्चपर्यंत पाटण महोत्सव होणार आहे. या महोत्सवात शेतकरी, उद्योजक आणि सर्वसामान्य नागरिकांना शेती, उद्योग, नवऊर्जा व स्थानिक उत्पादनांची माहिती मिळणार असल्याचे कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक याज्ञसेन पाटणकर आणि संजीव चव्हाण यांनी सांगितले.

यावेळी संयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. विलासराव कळंत्रे, समन्वयक डॉ. हेमलता काटे, सदस्य जगदीश शेंडे, सचिव विजय काटे, सदस्य डॉ. दीपक पाटील, डॉ. विनायक राऊत, डॉ. संतोष पाटील, डी. डी. थोरात, शिवहर आंबेगावे, अनिल पाटील, विनायक माथणे, सतीश गायकवाड उपस्थित होते.

महोत्सवात भात, नाचणीसह विविध धान्यांचे प्रदर्शन आणि विक्री होणार आहे. शेतकऱ्यांना आपल्या उत्पादनांची थेट विक्री करता येणार आहे. आधुनिक शेती अवजारे, लघुउद्योगांती नावीन्यपूर्ण उत्पादने आणि सौरऊर्जा उपाययोज यांचे सादरीकरण येथे पाहायला मिळेल. बच गटांनी तयार केलेली हस्तकला, घरगुती प्रक्रि उत्पादने, मसाले, पापड-लोणची यासह विवि वस्तूंचे भव्य प्रदर्शन व विक्री येथे होणार आ

प्रदर्शनाला भेट द्यावी. खरेदी-विक्र सहभागी व्हावे. आणि या लोकाभिमु उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, अ आवाहन करण्यात आले आहे.


Satara Edition

Feb 23, 2026 Page No. 5

Powered by: erelego.com


वार - सोमवार